**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३३६/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. मो.अय्युब मो.युसूफ,
मटन मार्केट, इतवारा बाजार, अमरावती,
जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
अन्नधान्य वितरण अधिकारी, अमरावती,
जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अ.का., पुरवठा विभाग, जिल्हा कार्यालय, अमरावती श्री.एस.आर. राऊत हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी (प्रभारी) श्री.विरेंद्र दिक्षीत हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक ०७/१२/२०१० रोजी हया आयोगाला अर्जदाराचे अपिल क्रमांक ३३६/२०१० खारीज करण्याबाबत विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणात अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३३५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. साहेबराव रघुपती खडसे,
संपादक, सांध्य दैनिक च्पुर्णकाळछ कार्यालय,
रा.भक्तीधाम रोड, चांदुर बाजार, जि.अमरावती.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, मोर्शी,
जि.अमरावती.
२. जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय,
मोर्शी, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. साहेबराव रघुपती खडसे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मोर्शी श्री.व्हि.के. वंजारी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मोर्शी श्री.व्हि.बी. वानखडे हे हजर आहेत.

अर्जदाराला खजिन उत्खननाबाबत माहिती दिली ती अपुर्ण दिली. उर्वरीत माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे असे उपविभागीय अधिकारी यांचे तर्फे हजर असलेले श्री.वंजारी यांनी सांगितले. तरी, जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मोर्शी यांनी अर्जदाराच्या अर्ज उर्वरित मुद्दयांकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे आजपासुन ८ दिवसाच्या आंत पाठवतील व त्यांना अर्जदाराला उर्वरीत मुद्दयाची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळवतील. त्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उर्वरित मुद्दयाबाबतची उपलब्ध असलेली माहिती ४ आठवडयाच्या आंत उपलब्ध करुन देतील व जी माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसेल त्याबाबत अर्जदाराला लेखी कळवतील व त्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाहीतर त्याच कार्यालयाचे अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करतील.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.

जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३३९/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. सुधाकर राजारामजी मेहेत्रे,
रा.हनुमान टाऊन, पो.जुना धामणगांव,
ता.धामणगांव (रेल्वे), जि.अमरावती.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक भुमि अभिलेख,
जिल्हा भुमी अभिलेख कार्यालय,
यवतमाळ, जि.यवतमाळ.
२. जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. सुधाकर राजारामजी मेहेत्रे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे प्रमुख लिपीक, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, यवतमाळ श्री. के.एम. पवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भुमी अभिलेख, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, यवतमाळ श्री.के.एम. दातार हे हजर आहेत.

अर्जदाराला दिनांक २६/०४/२०१० रोजी माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदाराने व्दितीय अपिल दिनांक २६/०२/२०१० रोजी दाखल केले आहे. तसेच चुकीच्या नोंदीच्या दुरूस्तीसाठी विहीत नमुन्यात जे अपिल करावे लागते ते जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडे करावे लागते व त्याकरिता अर्जदार जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडे चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीकरिता कायदेशीर अपिल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३४३/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. संजय दत्तात्रय जोशी,
रा.सुटाळा खुर्द, ता.खामगांव,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा,
जि.बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक, (मुख्यालय) बुलडाणा,
जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा श्री. शिवाजी वानखडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे पोलीस नाईक, ब.नं. ५०, पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा श्री.दिलीप बोरसे हे हजर आहेत.

अर्जदाराला दिनांक २०/०१/२०१० ला तसेच दिनांक ०७/०४/२०१० ला म्हणजेच प्रथम अपिलानंतर अर्जदाराला पुन्हा माहिती देण्यात आली आहे. अर्जदार माहिती मिळाल्यामुळे आज रोजी गैरहजर राहिले असावे, असा निष्कर्ष काढण्यात येतो. तसेच अर्जदाराने मागितलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती ही माहिती अधिकारात बसत नाही व संदिग्ध स्वरुपाची माहिती आहे. म्हणुन अर्जदाराचे व्दितीय अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३३८/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. जयंत संपतराव मोहोळ,
माधुरी वाईन बारचे मागे, डाबकी रोड,अकोला.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, अब्दुल गफ्फारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई-१८.
२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी कार्यालय,
अमरावती, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी कार्यालय, अमरावती श्री.ई.एम. चिम हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक ०४/०२/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले. सदर प्रकरणात अर्जदार आज रोजी गैरहजर आहे. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करण्याचे कारण कोणताही निर्णय किंवा माहिती न मिळाल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी श्री. श्री.ई.एम. चिम हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार या अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार अर्जदाराचे प्रपत्र 'ब' दिनांक १६/१२/०९ नुसार दाखल केलेल्या अपिलामध्ये दिनांक २०/०३/२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केला व त्यात अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४/११/०९ व दिनांक ०५/१२/०९ रोजी दिलेली आहे व अपिल निकाली काढण्यात येत आहे असा आदेश पारित केला आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक ०५/१२/०९ नुसार माहिती पाठविण्यात आली व त्याबाबतची दिनांक ०७/१२/०९ ला माहिती दिल्याची अर्जदाराची पोच जोडलेली आहे. सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, अमरावती यांनी अपिलकर्त्यास दिनांक २४/११/२००९ व दिनांक ०५/१२/२००९ रोजी माहिती दीलेली आहे. अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार विहीत मुद्दयाची माहिती प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त झालेल्या माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास ९० दिवसाचे आंत हया आयोगासमोर अपिल दाखल करु शकता असे म्हटले आहे. परंतु प्रथम अपिलात २० मार्च २०१० रोजी निकाल दिलेला आहे व त्या आधी दाखल केलेले व्दितीय अपिल दिनांक ०४/०२/२०१० हे कालबाहय (प्रीमॅच्युअर) आहे. अर्जदाराचे दिनांक २०/०३/२०१० च्या निर्णयाचे अर्जदाराचे समाधान झाले असल्यामुळे अर्जदार गैरहजर राहीले असावे असा निष्कर्ष काढण्यात येतो व

अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदाराने झालेल्या विलंबाबाबत क्षमापित करण्याबाबतचा अर्ज व व्दितीय अपिल या आयोगासमोर सादर करावे. अन्यथा अर्जदाराचे

समाधान झाले असावे असा निष्कर्ष काढण्यात येतो व अर्जदाराचा अर्ज कालबाहय असल्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते. सदर प्रकरणात दिनांक २०/०३/२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिल निकाली काढल्यामुळे अर्जदाराचे व्दितीय अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३३७/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रामराव बापुराव देशमुख,
मु.पो. निंभा, ता.बाळापुर, जि.अकोला.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापुर,
ता.बाळापुर, जि.अकोला.
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, निंबा,
ता.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १४/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. रामराव बापुराव देशमुख हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बाळापुर श्री.आर.जी. मसराम हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, निंबा श्री.बि.एस. गरकल हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराला आजपर्यंत कुठलीही माहिती पुरविण्यात आली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात दिनांक ०३/०२/२००९ रोजी आदेश पारित केलेला आहे व त्यात जन माहिती अधिकारी हे दिनांक १२/०६/२००९ व दिनांक ३१/०७/२००९ या दोन्ही तारखेला गैरहजर होते तसेच अपिलीय अधिकारी यांनी मागितलेल्या खुलाशावर प्रतिसाद सुध्दा दिला नाही व कर्तव्यात कसुर केली आहे व त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नुसार कार्यवाही करुन अहवाल एक महिन्यात देण्यात यावा असे म्हटले आहे. तसेच अपिलार्थी हे सुध्दा दिनांक ३१/०७/२००९ ला गैरहजर होते त्यामुळे अर्जदाराला श्री.गरकल, सचिव यांनी १५ दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दयावी व माहिती दिली किंवा नाही हयाबाबत अहवाल विस्तार अधिकारी (पंचायत) यांना सादर करावा, असा आदेश देवुन सुध्दा कुठलाही अहवाल सादर केलेला नाही तसेच अर्जदाराला माहिती दिली नाही. आज संबंधित सचिव यांना सुनावणी दरम्यान माहिती का दिली नाही असे विचारले असता त्यांनी सांगितले की, जी माहिती मागितली त्याचा कालावधी दिलेला नाही. परंतु त्याबाबत अर्जदाराला कुठल्याही प्रकारे लेखी दिले नाही किंवा तक्रार केली नाही व माहिती का दिली नाही व अहवाल का दिला नाही याबाबत स्पष्टीकरण गटविकास अधिकारी यांना दिलेले नाही. सचिव, ग्रामपंचायत, निंबा यांनी हया आयोगासमोर लेखी निवेदन दाखल केले व त्यात अर्जदाराला कोणती माहिती हवी आहे हे आपले समक्ष मला अवगत करावे व कालावधी दयावा जेणेकरुन सदरची माहिती ८ दिवसाच्या आंत देण्यात येईल. परंतु प्रपत्र ‘अ’ दाखल केल्यापासुन १

वर्षाचा कालावधी होवुनही अर्जदाराला कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे पालन केलेले नाही. सदर प्रकरणात सचिव, ग्रामपंचायत, निंबा तथा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्ज कलम ७(१) नुसार निकाली न काढल्यामुळे त्यांना दोषी ठरविण्यात येवुन त्यांचेविरुध्द या अधिनियमाच्या कलम २०(१) प्रमाणे शास्ती लावण्यात येवुन रु. २५००/- (रु. दोन हजार पाचशे फक्त) दंड लावण्यात येतो व सदर दंड त्यांच्या पगारातुन पुढील महिन्यापासुन दरमहा रु.५००/- प्रमाणे ५ महिन्यात वसुल करुन माहिती अधिकार लेखाशिर्षाखाली जमा करावा अशा सुचना गटविकास अधिकारी यांना देण्यात येते. तसेच दिनांक २४/१२/२०१० रोजी अर्जदाराला पाहिजे असलेल्या माहितीचे निरीक्षण देवुन जी माहिती पाहिजे त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्या.

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वरील माहिती २००५ ते २०१० या कालावधीतील पाहीजे. तरी, त्याबाबत कार्यवाही दिनांक २४/१२/२०१० ला करण्यात येवुन अहवाल गटविकास अधिकारी यांना पाठवावा व त्याची प्रत या आयोगास सादर करावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**